महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्र. अधापु २०२१/ प्र.क्र. १४/ना.पु.२२ दिनांक : २६ ऑगस्ट, २०२१.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा.

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी **माहे ऑक्टोबर, २०२१ ते मार्च, २०२२** करिता मासिक नियतन.

संदर्भ :-१) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) भारतीय अन्न महामंडळाचे पत्र क्र. S&S/NFSA Allocation/२०२१-२२/RO(M), दिनांक २१.६.२०२१.
४) शासन पत्र समक्रमांक दि. २३.२.२०२१ व दि. ३.६.२०२१.

भारतीय अन्न महामंडळाच्या दि. २१.६.२०२१ च्या पत्रान्वये राज्य शासनाने राज्य योजनेंतर्गत वितरीत केलेल्या परंतू राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरीत करण्याकरिता माहे जुलै, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीसाठी गहू ₹२१.०० प्रति किलो व तांदुळ ₹२२.०० प्रति किलो या दराने अन्नधान्य मंजूर केले आहे. सदर नियतनाच्या अनुषंगाने उपरोक्त १४ जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या ३९,९७,१८३ एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांसाठी माहे ऑक्टोबर, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधी करिता याद्वारे अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्यात येत असून जिल्हानिहाय अन्नधान्याच्या मासिक नियतनाचा तपशील सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. **उपरोक्त अन्नधान्याकरिता डि.ओ. निर्गमित करताना "Allocation of foodgrains to the persons not covered under NFSA, 2013 during COVID-19 period" असा उल्लेख करावा. त्याआधारे संदर्भाधिन दि. २१.६.२०२१ च्या पत्रान्वये मंजूर केल्यानुसार सदर अन्नधान्याची उचल भारतीय अन्न**

**महामंडळाकडून गहू ₹२१.०० प्रति किलो व तांदुळ ₹२२.०० प्रति किलो या दराने करावी.** पात्र लाभार्थ्यांना गहू ₹ २/- प्रतिकिलो व तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करावे.

३. सदर नियतनातील अन्नधान्याकरिता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मुदतीप्रमाणे म्हणजेच नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यातील शेवटच्या दिनांकापर्यंत राहील.

४. सोबतच्या विवरणपत्रातील नियतनाच्या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

५. **माहे ऑक्टोबर, २०२१ ते मार्च, २०२२** या कालावधीसाठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

६. दि. २३.२.२०२१ व दि. ३.६.२०२१ च्या शासन पत्रातील अन्नधान्य वितरण व उपयोगिता प्रमाणपत्राबाबत करावयाच्या सूचना विचारात घेण्यात याव्या.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- विवरणपत्र.

प्रत:- १) उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार व विहीत दराने धान्याची उचल होत असल्याची खातरजमा करावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबत विवरणपत्र विहीत करुन त्याचा तपशील सर्व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावा. सदर उचल व वाटपाबाबतचा मासिक अहवाल कक्ष अधिकारी (नापु-२२), अ. ना. पु. व ग्र. सं. वि. यांच्याकडे सादर करावा.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

शासन पत्र क्र. अधापु-२०२१/प्र.क्र.१४/नापु-२२, दि.२६.८.२०२१ सोबतचे विवरणपत्र

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या शिधापत्रिकाधारकांकरिता (शेतकरी ) माहे ऑक्टोबर, २०२१ ते मार्च, २०२२ करिता मासिक नियतन

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्य संख्या | नियतनाचे परिमाण (कि.ग्रॅ.) | | मासिक नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | औरंगाबाद | ३,५८,०९१ | ३ | २ | १,०७४ | ७१६ | १,७९० |
| २ | जालना | १,४३,०१२ | ३ | २ | ४२९ | २८६ | ७१५ |
| ३ | नांदेड | ३,८४,८६२ | ३ | २ | १,१५५ | ७७० | १,९२५ |
| ४ | बीड | ५,५३,५२६ | ३ | २ | १,६६१ | १,१०७ | २,७६८ |
| ५ | उस्मानाबाद | २,५०,८८१ | ३ | २ | ७५३ | ५०२ | १,२५५ |
| ६ | परभणी | २,५३,७८४ | ३ | २ | ७६१ | ५०८ | १,२६९ |
| ७ | लातूर | २,९९,९३६ | ३ | २ | ९०० | ६०० | १,५०० |
| ८ | हिंगोली | १,६९,५२५ | ३ | २ | ५०९ | ३३९ | ८४८ |
| ९ | अमरावती | ५,०३,४९९ | ३ | २ | १,५०९ | १,००६ | २,५१५ |
| १० | वाशिम | ९९,७१३ | ४ | १ | ३९९ | १०० | ४९९ |
| ११ | अकोला | १,९२,५५४ | ४ | १ | ७७० | १९३ | ९६३ |
| १२ | बुलढाणा | ३,७२,०२३ | ४ | १ | १,४८८ | ३७२ | १,८६० |
| १३ | यवतमाळ | ३,५८,९९६ | ३ | २ | १,०७७ | ७१८ | १,७९५ |
| १४ | वर्धा | ५६,७८१ | ३ | २ | १७० | ११४ | २८४ |
| एकूण | | ३९,९७,१८३ | | | १२,६५५ | ७,३३१ | १९,९८६ |